## ग्यानप्रकाश फाउंडेशन, विषयी

शाश्वत विकास साधायचा असेल तर ग्रामीण प्राथमिक शिक्षणाचा दर्जा हा उत्तमच असायला हवा. महाराष्ट्रात जरी शहरीकरणाचा विस्तार होत असला तरी आजही ६०% ग्रामीण भागातील विद्यार्थी हे शासकीय जिल्हा परिषदांच्या शाळांवरच अवलंबून आहेत. यातील बहुतांशी विद्यार्थी हे निम्न उत्पन्न गटातील आहेत, ज्यांना खाजगी शाळांचा खर्च परवडणारा नाही. ग्यानप्रकाश फाउंडेशन, अशा विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी काम करते.

अर्थात हे उद्दिष्ट गाठायचे असेल तर शासनाच्या धोरणांना अनुसरूनच काम करायला हवे. हा बदल सर्वदूर पोहोचवायचा असेल तर शिक्षक, समाज आणि प्रशासकीय यंत्रणेची भूमिका महत्वाची आहे. ग्यानप्रकाश फाउंडेशन या दृष्टीने वरील तीनही घटकांना सोबत घेऊन काम करत आहे.

मुल नेमकं कसं शिकतं? हे पाहण्यासाठी संस्थेने सुरुवातीला काही शाळांमध्ये शिक्षकांच्या आणि पालकांच्या सहकार्याने कामास सुरुवात केली. यातून काही प्रयोग करता आले आणि नेमकं काय काम करायला हवं? याची समज तयार झाली.

हा सर्व अनुभव घेऊन वेल्हे तालुक्यात प्रत्यक्ष शासकीय यंत्रणेबरोबर काम सुरु झाले. सुरुवातीला शाळामधील प्रत्यक्ष गरजा लक्षात घेऊन नेमकं काय करायला हवं याच नियोजन तयार करण्यात आले. हा सर्व कार्यक्रम पूर्णपणे शासकीय धोरणांना अनुसरून आणि यंत्रणेला विश्वासात घेउनच आखला गेला. महाराष्ट्र शासनाने याचवेळी शाळांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र या कार्यक्रमाची घोषणा केली. ग्यानप्रकाश फाउंडेशनने या कार्यक्रमास अनुसरून शिक्षकांमधील आपापसातला संवाद व देवाणघेवाण वाढविणे व प्रत्यक्ष गरजेनुसार शाळांना सहकार्य करणे यावर भर दिला आहे. तसेच राज्याची शैक्षणिक धोरणे व कार्यक्रम याबाबत शिक्षक, केंद्रप्रमुख आणि प्रशासकीय यंत्रणेची समज वाढविणे व त्या सर्वांचे शाळांच्या बदलासाठी योगदान वृद्धींगत करणे यासाठी हि प्रयत्न होत आहेत.

या सर्व अनुभवातून २०१६ पासून महाराष्ट्रातील शैक्षणिक दृष्ट्या मागास असलेल्या चार जिल्ह्यांपैकी नंदुरबार आणि परभणी या दोन जिल्ह्यातही संस्थेने कामास सुरुवात केली आहे. प्रत्यक्ष बदलातून शासकीय यंत्रणा सक्षम करणे आणि पूर्ण जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासाला चालना देणे यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

देशातील प्रत्येक मुलाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी शाळा सक्षम व परिपूर्ण व्हाव्यात हेच आमचे स्वप्न आहे.

gyan prakash FOUNDATION

शिक्षक समृध्दीकरण पुस्तकमाला
शिक्षकांनी शिक्षकांसाठी .....

# पुस्तिका १ - शाळा प्रगत होण्यासाठी नाविन्यपूर्ण उपक्रम ....



ग्यानप्रकाश फाउंडेशन, पुणे

“ग्यानप्रकाश फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या आलेखाची उंची वाढविण्यासाठी सन २०१४–१५ मध्ये वेल्हे तालुक्यातील पहिल्या सहा केंद्रामध्ये गुणवत्तेचे बीज रोवले, ते उत्तम प्रकारे रुजवण्याचे कार्य केंद्रप्रमुख व सर्व शिक्षक टीमने केले. प्रत्येक शिक्षकांस विद्यार्थ्यांची गुणवत्ता विकसित करण्यासाठी वर्तनवाद अध्यापन प्रक्रियेत बदल करून रचनावाद स्वीकारण्यासाठी संस्थेच्या मदतीने अनेक कार्यशाळा घेण्यात आल्या. आज नक्कीच मला खूप आनंद होतोय की माझी प्रत्येक शाळा प्रगतीपथावर आहे.

जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत २५ निकष पूर्तीसाठी संपूर्ण तालुक्यातील शिक्षकांच्या उपक्रमांचे संकलन करून त्यातील निवडक उपक्रम सगळीकडे राबवण्याचा अनोखा मार्ग ग्यानप्रकाश फाउंडेशन ने अवलंबला जो अत्यंत उपयुक्त ठरून केंद्राला दिशादर्शक ठरला असून आज माझा प्रत्येक शिक्षक कृतीतून नाविन्यपूर्ण उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत मार्गदर्शन करतो यामुळे माझ्या केंद्राला नवी दिशा मिळाली आहे.”

**– चिंतामण अद्वैत, केंद्रप्रमुख सुरवड**

“प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र व 'जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम' या महत्त्वाकांशी प्रकल्पाअंतर्गत वेल्हे तालुका शैक्षणिकदृष्ट्या जलद गतीने प्रगत करण्यासाठी वेल्हे पंचायत समिती शिक्षण विभागाच्या व ग्यानप्रकाश फाउंडेशन या सेवाभावी शैक्षणिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेला कृती आराखडा वेल्हे तालुक्याच्या शैक्षणिक विकासातील एक दीपस्तंभच मानावा लागेल.

'व्यक्ती तितक्या प्रवृत्ती' या उक्तीप्रमाणे प्रत्येक शिक्षकामध्ये एक तरी वेगळा गुण असतोच. याची प्रचीती जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाच्या २५ निकषनिहाय उपक्रमांची यादी तयार करताना आली. तालुक्यातील प्रत्येक शिक्षक हा आपल्या विद्यार्थ्यांसाठी नानाप्रकारचे उपक्रम राबवित असतो. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे चित्र डोळ्यासमोर ठेऊन प्रत्येक केंद्रातील २–३ नवोपक्रमशील शिक्षकांची नेमलेली 'कोअर कमिटी' ही महत्वपूर्ण ठरली. या संबंधित शिक्षकांनी आपापल्या केंद्रातील शाळेमध्ये राबविण्यात येणारे बरेच उपक्रम निकषनिहाय, साहित्य व कृतीच्या विश्लेषणासह सादर केले, ते राज्यातील प्रत्येक शाळेसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहेत. आपल्या भागातील शिक्षकांच्या अंगी असलेले विविध कलागुण व विभिन्न शालोपयोगी उपक्रम प्रकाशझोतात आणण्यासाठी केंद्रप्रमुख व ग्यानप्रकाश फाउंडेशन यांनी केलेले प्रयत्न निश्चितच वाखाणण्याजोगी आहे. पुढील शैक्षणिक कार्यासाठी शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक घटकाला मनापासून शुभेच्छा !!!

**– श्री. सुरेश कोळी, पदवीधर शिक्षक – पाबे.**

“प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत २५ निकषानुसार वेल्हे तालुका प्रगत करण्यासाठी केंद्रप्रमुख व ग्यानप्रकाश फाउंडेशनच्या पुढाकाराने सहविचार सभा होऊन नियोजन करण्याचे ठरले. आपल्याच केंद्रातील शिक्षकांच्या ज्या कल्पना, उपक्रम आहेत त्यांचा इतर केंद्रातील शिक्षकांना उपयोग करून देता येईल का? प्रत्येक निकषासाठी काही शैक्षणिक साधने, उपक्रम निवडता येतील का? या हेतूने आपल्या केंद्रात कार्यशाळा घेऊन प्रत्येक निकषाला २ उपक्रम प्रत्येक शाळांनी सुचवावेत आणि त्यातील दोन चांगले उपक्रम केंद्रस्तरावर सादरीकरणातून एकत्रितरित्या निश्चित करून हे पूरक उपक्रम संपूर्ण तालुक्यालाच दिशादर्शक होतील असा विचार समोर आला. त्यानुसार उपक्रमांची निश्चिती झाली. प्रत्येक मुल शिकण्यासाठी माझ्या प्रत्येक शिक्षकाजवळ ही उपक्रम पुस्तिका असावी, हा उद्देश समोर ठेऊन ग्यानप्रकाश फाउंडेशनने ही पुस्तिका तयार केली आहे.

असा प्रयोग झालेला माझ्या ऐकण्यात व वाचण्यात नाही. या पुस्तिकेमुळे दुर्गम वेल्हे तालुका प्रगत होण्यासाठी तर निश्चितच मदत होईल पण हे सर्व उपक्रम पूण तालुक्यालाच दिशादर्शक ठरतील. प्रत्येक मुल शिकण्यासाठी ग्यानप्रकाश फाउंडेशनने तयार केलेल्या पुस्तिकेला खूप शुभेच्छा !!!

**– राजेंद्र जगताप ,केंद्रप्रमुख मांजाई आसनी**

“प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र हे आव्हान सामोर ठेवून इतर कुठे भेटि न देता 'तुझे आहे तुजपाशी'या उक्तिप्रमाणे वेल्हे तालुक्यातील शिक्षकांच्या कल्पना शक्तिचा इथल्याच उपक्रमांच संकलन करण्याचे ग्यानप्रकाश फाउंडेशन ने ठरवल आणि आपल्याकडेच किती भन्नाट कल्पना आहेत याची जाणीव शिक्षकांना करुन दिली. मग केंद्रस्तरावर चर्चासत्रातून निवडलेले प्रातिनिधिक उपक्रम, बिट अन तालुकास्तरावर शिक्षकांकडून सादर करण्यात आले. त्यावेळचा अनुभव अतिशय समृद्ध करणारा होता.बरेच नविन उपक्रम आणि अध्ययन अनुभव माहीत झाले. त्याच संकलन करुन ते सर्व शाळांवर राबवले जात आहेत. माझा स्वतःचा वैयक्तिक अनुभव म्हणजे या सगळ्या उपक्रमांचा प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत २५ निकषांची पूर्ति करण्यासाठी खूप उपयोग होत आहे आणि ज्ञानरचना वादातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दिशेने आम्ही सर्व यशस्वी वाटचाल करत आहोत. असेच मोलाचे मार्गदर्शन आम्हाला उत्तरोत्तर लाभत राहो. ग्यानप्रकाश फाउंडेशन चे खूप आभार आणि खूप खूप शुभेच्छा !!!

**– शीतल सोनावणे, शिक्षिका– सोंडे हिरोजी.**

***शाळा प्रगत होण्यासाठी***

***नाविन्यपूर्ण उपक्रम ....***

ग्यानप्रकाश फाउंडेशन, पुणे

**मार्च २०१७**

**प्रकाशक**
ग्यानप्रकाश फाउंडेशन, पुणे

**आतील रेखा चित्रे व कव्हर डिझाईन**
लीना माणकिकर

**मांडणी व मुद्रण**
मुद्रा,
३८३, नारायण पेठ,
पुणे ४११ ०३०

# प्रस्तावना

ग्यानप्रकाश फाउंडेशन, राज्य शिक्षण विभागाच्या राज्य गुणवत्ता कक्षाच्या संकल्पनेनुसार वेल्हे तालुक्यात शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी, नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करीत आहे. संस्थेचे उपक्रम हे शिक्षक, केंद्रप्रमुख यांच्या पुढाकाराने व तालुकास्तरीय शिक्षण यंत्रणेच्या सहभागाने राबविले जातात.सदर उपक्रम हे प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र धोरणाशी सुसंगत आहेत.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र धोरण हे राज्यभर एक शैक्षणिक चळवळ म्हणून राबविले जात आहे. या प्रयत्नांना बळ देण्यासाठी प्रत्यक्ष वर्गात, मुलांसोबत काम करताना शिक्षकांना मदत होईल अशा उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यास सहाय्य करण्याची आमची भूमिका आहे.

शिक्षकांमध्ये आपसात चांगल्या उपक्रमांची व अनुभवांची देवाण–घेवाण होण्यासाठी केंद्र प्रमुखांच्या नेतृत्वाखाली केंद्र स्तरीय शिक्षण परिषदांचा वेल्ह्यात प्रभावी वापर केला जात आहे.वेल्हे तालुक्यातील शिक्षण परिषदा या नियमित व शैक्षणिक चर्चांचे व्यासपीठ कशा होतील यावर आम्ही सर्वच भर देत आहोत.

प्रगत शाळेसाठीचे २५ निकष हे शासनाने निश्चित केलेले आहेत. त्यानुसार वेल्ह्यातील शिक्षण परिषदांमध्ये चर्चा करताना आपल्या शाळा या निकषांनुसार नेमक्या कोणत्या पातळीवर आहेत याचे शिक्षकांनी स्वतः मूल्यमापन केले. ज्या निकषांमध्ये आपण कमी पडत आहोत त्यासाठी इतर शाळांमध्ये काय उपक्रम राबवले जात आहेत. याची बीट पातळीवर चर्चा करण्यात आली आणि त्यामधूनच शिक्षक राबवित असलेले हे नाविन्यपूर्ण उपक्रम समोर आले.

मुलांची विचारशक्ती, निरीक्षण क्षमता व कल्पनाशक्तीस चालना देणाऱ्या कृतींचा नाविन्यपूर्ण उपक्रमात समावेश केला आहे.शिक्षकांनी शिक्षकांच्या गरजा ओळखून शिक्षकांसाठी तयार केलेले हे अनुभवसिद्ध लिखाण शिक्षकांच्याच लेखणीतून उतरले आहे.

ग्यानप्रकाश फाउंडेशन संस्थेद्वारा याचे संपादन व संकलन करण्यात आले आहे.

प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र अंतर्गत कार्यरत, महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांना हे उपक्रम नक्कीच दिशादर्शक ठरतील. या विचारातून वेल्ह्याच्या दापोडे, मार्गासनी, मांगदरी, मंजाई आसनी, सूरवड व साखर या सहा केंद्रातील  सर्व केंद्रप्रमुख आणि उपक्रमशिल शिक्षक यांनी निवडलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची पहिली पुस्तिका सादर करताना आम्हांस  आनंद होत आहे

# अनुक्रमणिका


| अनु क्र. | उपक्रमाचे नाव | पान क्र. |
|---|---|---|
| १ | संगीतमय खुर्ची /संख्यावाचन / लेखन | १ |
| २ | विहीर भरा | ३ |
| ३ | दानपेटी | ५ |
| ४ | रावसाहेबांचा खेळ | ७ |
| ५ | संख्या चक्रातून गणितीय क्रिया | ९ |
| ६ | पदावलीची गोष्ट | ११ |
| ७ | माझी दिनदर्शिका | १३ |
| ८ | सत्रानुसार भिंतीवर पाठ्यपुस्तक लावणे | १५ |
| ९ | शब्दमनोरा | १७ |
| १० | छोटा भीमचा खेळ | २० |
| ११ | ज्योतीषाचा खेळ | २२ |
| १२ | हुशार बाबा आला रे...हुशार बाबा आला | २४ |
| १३ | घड्याळबाबाची गोष्ट | २७ |
| १४ | अतिरिक्त उपक्रमांची यादी– भाषा | २९ |
| १५ | अतिरिक्त उपक्रमांची यादी– गणित | ३२ |
| १६ | अतिरिक्त उपक्रमांची यादी– अभिव्यक्ती | ३६ |

**निकष :– क्र. ५**

**सर्व विद्यार्थ्यांना किमान ५ गणिती संख्या अचूक लिहिता व वाचता येणे. (इ.१ साठी दोन अंकी व पुढे प्रत्येकी एक एक अंक वाढवत जाणे)**

- **उपक्रमाचे नाव** – **संगीतमय खुर्ची,संख्यावाचन/लेखन.**
- **उद्दिष्टे** – सर्व विद्यार्थ्यांना किमान ५ गणिती संख्या वाचन व लेखन करता येणे.
- **साहित्य** – खुर्च्या, गळ्यात अडकवण्यासाठी ० ते ९ लिहलेले अंककार्ड आयकार्डच्या स्वरुपात, वह्या,स्केचपेन.

- **कृती –**

१. प्रथम मैदानावर संगीत खुर्ची खेळासारख्या खुर्च्या मांडून घेणे. समजा १० खुर्च्या मांडल्या असतील तर १० विद्यार्थ्यांच्या गळ्यात ० ते ९ अंक लिहिलेले प्रत्येकी एक–एक आयकार्ड घालण्यास द्यावे.



२. संगीत सुरु झाल्यानंतर पळण्यास सांगावे. २–३ मिनिटे संगीत सुरु ठेवावे. संगीत बंद केल्यानंतर विद्यार्थ्यांना जी जवळची खुर्ची मिळेल त्यावर विद्यार्थ्यांना बसण्यास सांगावे. या संगीतामध्ये आपण कविता, पाढे (संगीतमय), गीतमंचातील गाणी वाजवू शकतो.

३. संगीत बंद झाल्यावर मुले खुर्चीवर बसली, की एका बाजूचे विद्यार्थी आपल्या हातातील अंककार्ड  हातात घेवून वर करून दुसऱ्या बाजूच्या विद्यार्थ्यांना दाखवतील. तेव्हा त्यांना तयार झालेली संख्या मोठ्याने वाचायला सांगावी. व पहिल्या बाजूच्या विद्यार्थ्यांनी ऐकलेली संख्या आपल्या वहीत लिहायला सांगावी. त्यानंतर शिक्षक ते तपासतील.

४. हीच कृती दुसऱ्या बाजूकडून होईल. विद्यार्थी खुर्चीवर बसल्यानंतर त्वरित इतर विद्यार्थी त्यांच्याकडे वही देतील.

## • अध्ययन निष्पती –

१. आनंद तसेच मनोरंजनातून संख्यांचे वाचन व लेखन यांचे दृढीकरण होते. हे आपण शारीरिक शिक्षण तासिकेला घेवू शकतो.विद्यार्थी आवडीने करतात.

लेखन : श्री. सचिन लोणंदकर, निगडे बु.
केंद्रप्रमुख : श्री. सुरेश कदम,मांगदरी, वेल्हे.

**निकष – क्र. ६**

**शैक्षणिक साहित्याच्या सहाय्याने किमान एक बेरीज करता येणे.**

- **उपक्रमाचे नाव – विहीर भरा**
- **उद्दिष्टे** – १. पहिलीच्या विद्यार्थ्यांना व अप्रगत विद्यार्थ्यांना खेळातून बेरीज संबोध स्पष्ट करता येणे.
  २. बेरजेची संकल्पना स्पष्ट करता येणे.
  ३. विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.
- **साहित्य** – एक फुटाचे दोन गोल पाईपकार्डस शिट पेपर चे केले तरी चालू शकतील, सेलोटेप हा पाईप चिटकवण्यासाठी, ट्रे,गोट्या/मन्या/चिंचोके,खडे (यापैकी एक किमान १०० वस्तू)

- **कृती –**


१. एक फुटाचे गोल उभे पाईप भिंतीला सेलोटेपने चिकटवून घ्यावे.

२. खाली ट्रे ठेवून ट्रेचे दोन भाग करावे.(आकृतीत दाखविल्याप्रमाणे)

३. पहिल्या पाईपमधून वस्तू टाकाव्यात. (उदा.–५)

४. दुसऱ्या पाईपमधून वस्तू टाकाव्यात. (उदा.–३)

५. दोन्ही पाईपमधून टाकलेल्या वस्तू ट्रे मध्ये एकत्र होतील.  सर्व वस्तू मोजून घ्याव्यात.



६. मोजलेल्या वस्तू चौकटीत लिहाव्यात. (उदा.–८)

- **अध्ययन निष्पती –**

१. इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना हसत खेळत वस्तूच्या साह्याने अचूक बेरीज येते.

२. अप्रगत विद्यार्थ्यांना आडव्या मांडणीने बेरीज करता येते.

३. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.

लेखन : श्री.सुरेश कोळी, पाबे.

केंद्रप्रमुख :श्रीम. ज्योती चिलेकर, दापोडे, वेल्हे.

## निकष – क्र. ७

**शैक्षणिक साहित्याच्या सहाय्याने किमान एक वजाबाकी करता येणे.**

- **उपक्रमाचे नाव** – **दानपेटी**
- **उद्दिष्टे** – १. अप्रगत विद्यार्थ्याला खेळातून वजाबाकी करता येणे.
  २. इ.१ ली व २ रीतील मुलांना एकअंकी व दोन अंकी वजाबाकी करता येणे.
  ३. वजाबाकीची संकल्पना दृढ होणे.
- **साहित्य** – १. ट्रे (कागदी पुठ्ठे /प्लास्टिक यापैकी एक),ग्लास/पेटी (कागदी किंवा खडूचा रिकामा बॉक्स ), मणी/चिंचोके/गोट्या/खडे/बिया यापैकी कोणतेही साहित्य किमान १००.

- **कृती –**

१. वरील आकृतीप्रमाणे कागदी ट्रे मध्ये तीन भाग तयार करून घ्यावेत व पहिल्या भागामध्ये दान पेटी ठेवावी दुसऱ्या भागामध्ये समीकरण लिहावे व तिसऱ्या भागामध्ये उत्तर लिहावे.


२. समजा २२ – ८ असे समीकरण असेल तर २२ वस्तू मोजून घ्याव्यात व २२ मधून ८ वस्तू दान पेटीमध्ये दान कराव्यात व उरलेल्या वस्तू मोजून आलेले उत्तर तिसऱ्या भागामध्ये लिहावे.

- **अध्ययन निष्पत्ती –**

१. ज्या मुलांची संकल्पना स्पष्ट नाही अशा विद्यार्थ्यांना वजाबाकीचा संबोध स्पष्ट होतो.

२. मनोरंजनातून आनंददायी खेळाच्या माध्यमातून वजाबाकी अचूक करता येते.

३. दान करणे ही भावनिक प्रवृत्ती मुलांच्या अंगी दृढ होते.




४. आडव्या मांडणीने वजाबाकी अचूक करता येते.

लेखन : श्री.सुरेश कोळी, पाबे.
केंद्रप्रमुख : श्रीम. ज्योती चिलेकर, दापोडे, वेल्हे.

## निकष – क्र. ६ व ७

**बेरीज व वजाबाकी (हातच्याची)**

- **उपक्रमाचे नाव** – **रावसाहेबांचा खेळ**
- **उद्दिष्टे** – १. संख्या किंवा वस्तू एकमेकात मिसळणे ,एकत्र करणे किंवा मिळवणे म्हणजेच बेरीज हा संबोध स्पष्ट करता येण्यास मदत.
  २. वजाबाकी म्हणजे कमी करणे, काढून टाकणे असे संबोध समजावून सांगण्यास मदत.
  ३. हातच्याची बेरीज,वजाबाकी समजावून सांगणे.
- **साहित्य** – मणी,दगड,काड्या,शतक–दशक–एकक यांची प्रतीके

- **कृती –**

१. प्रथम विद्यार्थ्यांना शतक–दशक–एकक या स्थानानुसार गठ्ठे व सुट्टे समजावून सांगणे.


उदा: – १० एकक एकत्र आले कि १ दशक तयार होतो.

१० दशक एकत्र आले कि १ शतक तयार होतो.

२. त्यानंतर विद्यार्थ्यांना हातच्याची बेरीज करताना एककाच्या घरात १० एकक (१० सुट्टे) झाले कि ते एकक दशकाच्या घरात ठेवणे.त्याचप्रमाणे १० (१० गठ्ठे) दशक झाले कि ते १० दशक शतकाच्या घरात ठेवणे. हे समजावून सांगताना प्रतीकांचा,मण्यांचा वापर करणे.

३. वजाबाकी करताना बेरजेमध्ये दिलेले गठ्ठे पुन्हा हातचा घेताना सुट्टे करावेत हे सांगावे.

उदा. – एककाने दशकाकडून १ दशक (१ हातचा) घेतला म्हणजे तो एकक च्या घरात आल्यावर त्याचे सुट्टे १० एकक करावे हे मणी व दगड यांच्या साहाय्याने समजावून सांगणे.



४. संख्येतील स्थानांना एककराव,दशकराव,शतकराव अशी नावे देवून मुलांना मजेदार पद्धतीने स्थानांची ओळख करून देणे.

- **अध्ययन निष्पती –**

१. संख्येतील स्थानांना एककराव, दशकराव,शतकराव अशी नावे दिल्यामुळे विद्यार्थ्यांना स्थानाविषयी माहिती मिळून ते हातच्याची उदाहरणे अचूक सोडवितात.

२. गड्डे व सुट्टे समजल्यामुळे विद्यार्थी हातचा द्यायला व घ्यायला विसरत नाही.

लेखन : श्री.रविंद्र खुळे, कातुर्डेवाडी.
केंद्रप्रमुख : श्रीम. ज्योती चिलेकर, दापोडे, वेल्हे.


## निकष – क्र. ६, ७, ८, ९

- **उपक्रमाचे नाव** – **संख्या चक्रातून गणितीय क्रिया.**
- **उद्दिष्टे** – विद्यार्थ्यांना गणिती क्रिया करताना आनंद वाटणे.
- **साहित्य** – काड्या,खडे,मणी,बिया,खडू

## • कृती –

१. प्रथम विद्यार्थ्यांचे गट पाडावेत, गटा-गटात विद्यार्थ्यांना कृती करू द्यावी.

२. इ. १ ली २ री:- विद्यार्थांना काड्या/खडे यांचा वापर करून बेरीज वजाबाकी क्रिया करायला द्यावी.



३. इ. ३ री ४ थी:– बेरीज,वजाबाकी,गुणाकार,भागाकार करण्यास सोपे जावे. यासाठी पाच समांतर वर्तुळे फरशीवर आखून घ्यावे. त्यानंतर काळा रंग वापरून गणितीय चिन्हांचा वापर करून विद्यार्थ्यांना मुक्त गणिती क्रिया करू द्यावी.

४. इ. ५ वी ७ वी:– इयत्तानुरूप स्तर ठेवून अंक वाढवून गणिती क्रिया करायला देणे.

- **अध्ययन निष्पत्ती –**

१. संख्या चक्रातून संख्याज्ञान प्राप्त होते.

२. गणित, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार या गणितीय क्रियांची भीती दूर झाल्यामुळे विद्यार्थी आनंदाने शाळेत रममाण होतात.

- **वैशिष्टे –**

१. गणिती चक्राद्वारे एकाचवेळी बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार यांचा एकत्रित सराव अनेक विद्यार्थ्यांना देता येतो.

लेखन : श्री.नवनाथ कांबळे, वडगाव झांजे.

केंद्रप्रमुख :श्री. चिंतामण अद्वैत, सुरवड, वेल्हे.

## निकष – क्र. ६, ७, ८, ९

- **उपक्रमाचे नाव** – **पदावलीची गोष्ट**
- **उद्दिष्टे** – पदावली सोडवण्याच्या संकल्पना आणि नियम रंजक पद्धतीने समजावून सांगणे.
- **साहित्य** – whatsapp इमोजी (smiles) च्या प्रिंटआउटस किंवा फळ्यावर चित्र काढूनही सांगता येईल.

  पदावली शिकवताना आपल्या लक्षात येते की एका पदावली साठी विद्यार्थ्यांची अनेक उत्तरे येतात. चारही गणिती क्रियांचा समावेश असल्याने मुले गोंधळतात. हे टाळण्यासाठी पदावली पुढीलप्रमाणे गोष्टरूपात शिकवली कि संकल्पना दृढ होतात. यामध्ये पात्रांसाठी इमोजीज वापरण्यामागे एक गंमत आहे की मुले पालकांच्या मोबाईल मध्ये वारंवार इमोजीज पाहत असतात, त्यामुळे गोष्टीतील ही पात्रे त्यांना आपल्या जवळची वाटतात आणि ओढ निर्माण होते.

- **कृती –**


१. श्री. व सौ. गणिते – तर मुलांनो हे आहेत श्री. व सौ. गणिते (असे इमोजी फळ्यावर चिकटवून पात्र दर्शवू शकता/चित्र काढूनही चालेल).

२. या गणिते आई–बाबांना जेव्हा पहिल्यांदा बाळ झाल तेव्हा ती जुळी मुले होती. दोन्ही मुलगे होते. एकाचे नाव ठेवले गुणाकार आणि दुसऱ्याचे भागाकार.

३. अजून काही वर्षांनी त्यांच्याकडे बाळ जन्माला आले, तेव्हाही जुळी बाळे होती यावेळी दोन्ही मुलीच होत्या.मग एकीचे नाव ठेवलं बेरीज आणि दुसरीचे वजाबाकी.

४. आता जेव्हा पदावलीत हे एकत्र येतात तेव्हा ते मस्ती करतात म्हणून गणित बाबांनी नियम घालून दिलेत.ते असे की जेव्हा जुळी भावंड एकत्र जातील तेव्हा जो डावीकडे असेल त्याचा मान पहिला आणि मोठ्या भावांचा मान छोट्या बहिणीपेक्षा पहिला.

५. मग हे सगळे होत असताना छोट्या बहिणी रुसल्या, म्हाणाल्या, सारखाच दादांचा



काय मान? मग त्यांच्या मदतीला आला त्यांचा मामा आणि त्याचे नाव कंस मामा. मामा म्हणाला, तुमच्यापैकी जो कोणी माझ्या मांडीवर बसेल त्याचा मान पहिला.(मग इथे कंसातील क्रिया आधी करावी हे दृढ होते) अशारीतीने वेगवेगळी उदाहरणे देवून गोष्टीतून नियमांचे दृढीकरण करून घ्यावे.

- **काय साध्य झाले? –**

१. पदावलीचे नियम रंजक पद्धतीने दृढ होतात व मुले अचूक पदावली सोडवतात.

लेखन : श्रीम.शितल सोनावणे, सोंडे हिरोजी.
केंद्रप्रमुख : श्री. चिंतामण अद्वैत, सुरवड, वेल्हे.

## निकष – क्र. १०


- **उपक्रमाचे नाव** – **माझी दिनदर्शिका**
- **उद्दिष्टे** – १. प्रत्येक महिन्याचे दिवस, आठवडा, महिने या संकल्पना स्पष्ट होणे.
  २. दिनदर्शिका आणि व्यवहारिक दैनंदिन जीवन याचा आपल्या भावविश्वाशी संबंध जोडता येणे.
- **साहित्य** – दिनदर्शिकेसाठी गटानुसार ४ कागद, स्केचपेन,कात्री.

- **कृती –**

१. प्रत्येक विद्यार्थ्यास किंवा २–४ मुलांच्या गटात एक याप्रमाणे १२ महिन्यांसाठी १२ कागद व रंगीत स्केचपेन देणे.

२. शिक्षकाने मुलांना २०१७ या वर्षाची पहिली तारीख व वार सांगावा.



३. मुलांना क्रमाने वार व तारखा या चौकोन आखून जानेवारी महिन्याचे पान तयार करायला सांगावे. त्याचप्रमाणे उरलेल्या महिन्यांची१२ पाने तयार करायला सांगावीत. ती तयार  झाल्यावर एकत्र करून एक दिनदर्शिका तयार झाली. त्या दिनदर्शिकेस आपल्या शाळेचे नाव द्यायला सांगावे. उदा. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेरावणे– दिनदर्शिका २०१७

४. तयार झालेल्या दिनदर्शिकेत चालू महिन्यानुसार मुलांना स्वतःच्या भावविश्वातील संबंधित दिनविशेष तारखेच्या चौकोनात लिहायला सांगावे. उदा. – मुलांच्या जन्मतारखा, गावचा अखंड हरीनाम सप्ताह, गावाची जत्रा, बालसभा,शिक्षकांचे वाढदिवस, परिसर भेट, सहल, बालआनंद मेळावा इ. विविध घटना तारखेनुसार त्या त्या महिन्यात नमूद करायला सांगाव्या.

५. दिनदर्शिकेचा वापर शाळेत मुलांना रोज करायला सांगणे.

- **अध्ययन निष्पत्ती –**

१. दिनदर्शिका वाचन हे काम मुलांना मजेचे व आनंदाचे वाटते.

२. स्वतः दिनदर्शिका मुलांनी बनवल्यामुळे प्रत्येक महिन्याचे दिवस किती तसेच आठवडा, महिने या संकल्पना सहज समजतात.

३. स्वतःच्या भावविश्वातील घटना त्यात नमूद असल्यामुळे माझा वाढदिवस अजून
किती दिवसांनी आहे, आपली परिसर भेट घेऊन किती दिवस झाले अशा चर्चा मुलांमध्ये सुरु होतात.

लेखन : श्री.धोंडीराम नरुठे, मेरावणे.
केंद्रप्रमुख :श्री. पोपट नलावडे, साखर, वेल्हे.

## निकष – क्र. १६

**कोणत्याही वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यास चित्रवाचन करता आले.**


- **उपक्रम** – **सत्रानुसार भिंतीवर पाठ्यपुस्तक लावणे**
- **उद्दिष्टे** – १) पाठ्यपुस्तकाची भीती मनातून निघावी.
  २) ओझे कमी करणे.
  ३) पाठ्यपुस्तक आरशाप्रमाणे भिंतीवर लावणे.
  ४) चित्र पाहून नाव सांगण्याची ओढ निर्माण होणे.
- **साहित्य** – पाठ्यपुस्तकातील चित्रे,शब्द,कार्डशीट,कात्री,डिंक

- **कृती –**

१. सत्रानुसार पाठ्यपुस्तकातील सर्व चित्रे कापावी.

२. कापलेली चित्रे डिंकाच्या सहाय्याने कार्डशीटवर चिकटवून घ्यावी. त्यातील चित्रांची नावे कापून ती चित्राच्या बाहेर चिकटावीत.

३. आणि तयार झालेले कार्डशीट वर्गात लावावे.



- **अध्ययन निष्पती –**

१. विद्यार्थी चित्र पाहताच त्या चित्राचे नाव न चुकता लिहितात.

२. शब्दावरून मुले चित्र काढू लागतात.

३. चित्रावरून मुले अभिव्यक्त होतात.

लेखन : श्री. संजय मुंढरे, कोदवडी.

केंद्रप्रमुख :श्री. राजेंद्र जगताप,मंजाई आसनी, वेल्हे.


**निकष – क्र. १६, १७, १९, २५**

- **उपक्रमाचे नाव – शब्दमनोरा**
- **उद्दिष्टे** – १. अर्थपूर्ण क्रियाशील वाक्य तयार करता येणे.
  २. वाचन कौशल्य विकसित होणे.
  ३. आकलनक्षमता वाढणे.
- **साहित्य** – शब्दपट्ट्या फळ्यावर शब्द लिहिणे.

- **कृती –**

१. प्रथम विद्यार्थ्यांकडून कोणत्याही एका घटकावर आधारित वेगवेगळे तीन शब्द सुचवून घेणे.

उदा.– झाड बाबतीत तीन वेगळे शब्द मुलांना सांगायला सांगणे.



२. नंतर विद्यार्थ्यांकडून पहिल्या व दुसऱ्या शब्दांशी संबधित शब्द घेवून तो वर मांडणे.

३. दुसऱ्या व तिसऱ्या शब्दांशी संबधित शब्द विद्यार्थ्यांकडून घेवून तोही वर मांडावा.

४. नंतर वर मांडलेल्या दोन शब्दांशी संबधित आणखी एक शब्द घेवून तो वर मांडावा.

५. अशा पद्धतीने शब्दमनोरा तयार करून घ्यावा.

६. त्यानंतर खाली आकृतीत दाखवल्याप्रमाणे शेवट्च्या ओळीतील पहिला शब्द, मधल्या ओळीतील पहिला शब्द व वरच्या ओळीतील शब्द घेवून तिन्ही शब्द एका वाक्यात येतील असे क्रियाशील वाक्य तयार करून घेणे.

७. तयार झालेल्या वाक्यातुनच विद्यार्थ्यांना सहज कल्पना करून सुंदर गोष्ट तयार करून शीर्षक द्यायला सांगणे..


- **अध्ययन निष्पती –**

१. अर्थपूर्ण क्रियाशील जास्तीत जास्त वाक्ये तयार करतात.

२. वाचन कौशल्य विकसित होते.

३. आकलनक्षमता वाढते.

## शब्दमनोरा




(मुलांनी सुचविलेले शब्द व त्यावर आधारित मुलांनी तयार केलेली वाक्य पुढीलप्रमाणे)

१. शाळेतील मुले मैदानावर खेळतात.

२. मैदानावरील झाडांची लाकडे माणसाने तोडली.

३. झाडाच्या लाकडापासून आपण विविध प्रकारचे साहित्य बनवतो.

४. शाळेतील मैदानात खूप झाडे आहेत.

५. मैदानावरील झाडावर मुले चढली.


इयत्तानुरूप शब्दाची काठिण्यपातळी वाढवावी.

लेखन : श्रीम. स्वप्नाली रासकर, आसनी दामगुडा.
केंद्रप्रमुख : श्री. राजेंद्र जगताप,मंजाई आसनी, वेल्हे.

## निकष – क्र. ९

**शैक्षणिक साहित्याच्या सहाय्याने किमान एक भागाकार करता येणे**.

- **उपक्रमाचे नाव** – **छोटा भीमचा खेळ**
- **उद्दिष्टे** – १. अप्रगत विद्यार्थ्यांला मनोरंजक पद्धतीने भागाकाराची संकल्पना स्पष्ट करणे.
  २. भागाकार म्हणजे समान वाटणी करणे हा संबोध इ.१ली व २ रीच्या विद्यार्थ्यांना स्पष्ट करून सांगणे.
  ३. प्रत्येक विद्यार्थ्यांला शैक्षणिक साहित्याचा वापर करून भागाकार करता येणे.
- **साहित्य** – छोटा भीम, चुटकी,राजू,कालिया,ढोलू,भोलू, इंद्रवर्मा राजा, इंदुमती,जग्गू (चित्रांचे स्टीकर व कात्रण), आईसक्रिमच्या काड्या/गोट्या/मणी/खडे(यापैकी एक वस्तू किमान १००)
- **आकृती** –




- **कृती** –


१. भाज्या एवढ्या वस्तू मोजून घ्याव्यात. उदा.–२५

२. भाजकाएवढे कार्टुनची चित्रे जमिनीवर ठेवावीत. उदा.–४(भीम,चुटकी,राजू,जग्गू)

३. प्रत्येकाला एक–एक याप्रमाणे वस्तूचे वाटप करावे.

४. प्रत्येकाला समान वाटून शिल्लक राहिलेल्या वस्तू बाकी म्हणून नोंद कराव्यात.

५. आकृतीत दाखविल्याप्रमाणे मांडणी करून भागाकाराचा संबोध स्पष्ट करावा.



- **अध्ययन निष्पती –**

१. भागाकाराचा संबोध स्पष्ट होतो.

२. पहिली, दुसरी तसेच अप्रगत विद्यार्थ्यांना देखील भागाकाराचे गुण घेता येतील.

३. अप्रगत विद्यार्थी खेळातून प्रगत होतात.

लेखन : श्री.सुरेश कोळी, पाबे.

केंद्रप्रमुख : श्रीम. ज्योती चिलेकर, दापोडे, वेल्हे.

## निकष – क्र. ११

**प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यास वर्गानुकूल पाठ्यपुस्तकातील कोणतीही किमान पाच वाक्ये वाचता येणे.**

- **उपक्रमाचे नाव** – **ज्योतिषाचा खेळ**
- **उदिष्टे** –
  १. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी.
  २. विद्यार्थ्यांचे वाचन एकमेकांना समजणे.
  ३. खेळाच्या माध्यमातून वाचन कौशल्याचा विकास घडवून आणणे.
  ४. पाठ्यपुस्तकांची काळजी घेण्याची सवय लावणे.
- **साहित्य** – पाठ्यपुस्तक,मोरपीस/काडी

- **कृती –**

१. दोन–दोन विद्यार्थ्यांचे गट करून बसवावे.

२. दोघांमध्ये एक पुस्तक व मोरपीस किंवा काडी ठेवावे.

३. एकाच्या हातात पुस्तक व दुसऱ्याच्या हाती मोरपीस किंवा काडी द्यावी.

४. पुस्तक घेतलेल्या विद्यार्थ्यांने काडी घेतलेल्या मुलास पुस्तक समोर धरून काडी घालण्यास सांगावे.

५. काडी घातलेला भाग बुकमार्क असल्याने पुस्तक उघडून दोन्ही पानांपैकी कोणत्याही पानावरील पाच वाक्ये वाचून समोरच्याचे भविष्य सांगत आहे असे नमूद करावे.

६. वाचून झाल्यावर पुस्तक व काडी यांची अदलाबदल करून खेळ चालू ठेवावे.



- **अध्ययन निष्पती –**

१. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड लागते.

२. एकमेकांचे वाचन एकमेकांना कळते.

३. खेळातून वाचन कौशल्य वृद्धींगत होते.

४. पाठ्यपुस्तकाची निगा कशी राखावी याचे देखील ज्ञान मिळते.

लेखन : श्री.सुरेश कोळी, पाबे.
केंद्रप्रमुख : श्रीम. ज्योती चिलेकर, दापोडे, वेल्हे.

**निकष क्र. १७ , १८ , २५**

- **उपक्रमाचे नाव – हुशार बाबा आला रे....हुशार बाबा आला**
- **उद्दिष्ट** – १. दिलेल्या एका शब्दावर अनेक वाक्य तयार करणे.
  २. मुलामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे.
  ३. मुलांना कल्पना अभिव्यक्त करण्याची संधी देणे.
  ४. दिलेल्या कोणत्याही विषयावर पाच–दहा वाक्यावर विचार मांडता येणे.

- **साहित्य** – हुशार बाबाच्या डोक्यावर ठेवण्यासाठी मुकुट (याशिवाय टोपली, बादली देखील वापरू शकतो)

- **कृती –**

१) शिक्षकाने वर्गातील सर्व मुलांना गोलात उभे करावे.

२) शिक्षकाने गोलात मध्ये उभे राहून मुकुट स्वतःच्या डोक्यावर ठेवावा. आणि गोलात फिरत राहावे आणि विद्यार्थ्यांनी हुशार बाबा आला रे.... हुशार बाबा आला. असे म्हणावे.

३) गोलात फिरता फिरता शिक्षिकाने एका मुलाच्या डोक्यावर मुकुट ठेवावा.

४) ज्या मुलाच्या डोक्यावर मुकुट ठेवला आहे त्या विद्यार्थ्यांने शिक्षकांना उद्देशून हुशारबाबा – शब्द सांगा असे म्हणावे.

५) शिक्षकाने एक शब्द सांगावा व विद्यार्थ्याने त्या शब्दावरून एक वाक्य सांगावे आणि गोलात फिरता फिरता पुन्हा आपला मुकुट दुसऱ्या मुलाकडे द्यावा. वाक्य न सांगणारा बाहेर. अशी दुसरी, तिसरी, चौथी फेरी घ्यावी.

६) ज्या नंबरची फेरी असेल त्यावेळी प्रत्येकाने तेवढी वाक्य सांगावीत. उदा. पहिल्या फेरीला सर्व मुले एक वाक्य सांगतील, ती फेरी संपली कि दुसऱ्या फेरीला दोन वाक्य सांगतील. अशी वाक्य वाढत न्यावी.

७) एकच वाक्य पुन्हा येणार नाही याची दक्षता घ्यावी.


८) वाक्य सांगताना वेळेची मर्यादा ध्यानात घ्यावी.

९) जो विद्यार्थी वाक्याची पुनरावृत्ती करेल त्याला बाद करावे.

१०) प्रत्येक फेरीला वेगळा शब्द शिक्षकांनी सांगावा.

१२) सर्वात शेवटी जो विद्यार्थी शिल्लक राहील तो विजयी ठरवून त्याला शाब्दिक अथवा वस्तुरूपाने बक्षिस द्यावे.

१३) बोलीभाषा व व्याकरणदृष्ट्या सदोष वाक्ये देखील सुरवातीला स्वीकारावीत परंतु शिक्षकांनी तात्काळ दुरुस्ती करावी.



- **अध्ययन निष्पती –**

१) एका शब्दावरून अनेक वाक्ये तयार करता येतात.

२) आत्मविश्वासाची कमतरता असलेल्या मुलांचा आत्मविश्वास वाढतो.

३) मुलांचे भावविश्व समजायला मदत होते.

४) शब्दसंपत्तीत वाढ होते.

५) आनंददायी शिक्षणातून प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमातील निकष क्र–१७,१८ व २५ साध्य होवून १५ गुण मिळू शकतील.

लेखन : श्री.सुरेश कोळी, पाबे.
केंद्रप्रमुख : श्रीम. ज्योती चिलेकर, दापोडे, वेल्हे.

## निकष – क्र. २१


- **उपक्रमाचे नाव** – **घड्याळबाबाची गोष्ट**
- **उद्दिष्टे** – विद्यार्थ्यांना रंजक पद्धतीने घड्याळासंबधित संकल्पनांची ओळख करून देणे. (गोष्टरुपात)
- **साहित्य** – घड्याळाची प्रतिकृती /फळा,खडू.

  विद्यार्थ्यांना घड्याळ शिकवताना सुरुवातीला गोष्ट रुपात ओळख करून द्यावी आणि नंतर दृढीकरण करावे. आणि पुढीलप्रमाणे गोष्ट सांगावी.

- **कृती –**

१. हे आहेत घड्याळबाबा. त्यांना १२ मुले आहेत. त्यांची नावे. (गोष्ट सांगता सांगता फळ्यावर तसे काढत जावे).

२. सुरुवातीला हे १२ जण घोळक्यात होते. मग त्यांच्यात खूप दंगा व्हायचा म्हणून मग बाबांनी एक नियम घालून दिला. तुम्ही घरात भांडण करता तेव्हा तुमच्या घरात काही नियम असतात ना? अगदी तसच.



३. बाबांनी सांगितल की तुम्ही प्रत्येकानी आता ड रेषेच्या अंतरावर बसायचं (या ड रेषा म्हणजे मिनिट आहेत हे नंतर दृढीकरण करावे) तेव्हापासून हे ड रेषेवर बसलेले असतात.

४. घड्याळबाबांना ३ मित्र आहेत.हे ३ मित्र एकमेकांचे भाऊ आहेत. सगळ्यात मोठा भाऊ तासकाका/तासकाटा तो जाडा आहे.त्यानंतरचा मिनिट काटा तो उंच आणि लुकडा आहे.

५. सगळ्यात छोटा सेकंदकाटा तो सगळ्यात हाडकुळा आहे.

६. यावरून कोण सगळ्यात जोरात पळत असेल अन कोण हळू याची उत्तर मुलांकडून मिळवावीत.तास काटा लठ्ठ म्हणून हळूहळू सरकतो तर सेकंद काटा सगळ्यात जलद हे मुलांना लक्षात येते. अशाप्रकारे ओळख करून दिल्यानंतर हळूहळू एक एक संकल्पना दृढ करत जावी. त्यासाठी फरशीवरचे काढलेले घड्याळ किंवा प्रतिकृती वापरू शकता. अजून एखादी रंजक वृत्ती म्हणून एखाद्या मुलाला घड्याळावर झोपवून (फरशीवर मोठ्या आकारात काढलेल्या) हातांचे काटे बनवून दुसऱ्या मुलांनी वेळ ओळखणे असा खेळ घेता येईल.

- **अध्ययन निष्पती –**

मुलांची घड्याळ शिकण्याची उत्सुकता वाढते. मनोरंजक पद्धतीने सहज शिकतात.

लेखन : श्रीम.शितल सोनावणे, सोंडे हिरोजी.
केंद्रप्रमुख : श्री. चिंतामण अद्वैत, सूरवड, वेल्हे.

## निकष – क्र. २५ पूर्ततेसाठी अतिरिक्त उपक्रमांची यादी

### अ. भाषा

| निकष क्र. | निकष | उपक्रमांची सूची |
|---|---|---|
| ११ | प्रत्येक वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यास त्या वर्गानुकुल पाठ्य पुस्तकातील कोणतीही किमान पाच वाक्य वाचता आली. | **उपक्रम १ –** हवेत अक्षरे गिरवणे, कृती : वेगवेगळी अक्षरे, शब्द हवेत गिरवणे व मुलांनाओळखण्यास सांगणे.<br>**उपक्रम २ –** आदर्श प्रकट वाचन, कृती : शिक्षकांनी वाचनपट्ट्या, प्रत्येक धड्यातील वाक्य तयार करून वाक्य संच, स्वरचिन्ह कार्ड या माध्यमातून विरामचिन्हांचा वापर करून प्रकट वाचन मुलांसमोर करावे.<br>**उपक्रम ३ –** ज्योतिष खेळ सविस्तर कृती पान क्र.२२ व २३ वर पहा.<br>**उपक्रम ४ –** जादुई अक्षरे, कृती : मुलांनाअक्षरे, अंक यावर वेगवेगळ्या बिया लावायला सांगून या जादुई अक्षरांचा फोटो काढूनपालकांना पाठवावा.<br>**उपक्रम ५** – पाठ्यपुस्तकातील पाठ मोबाईलवर रेकॉर्ड करणे.कृती: शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील पाठ वाचताना स्वतःचे त्याचे मोबाईलवर रेकॉर्ड करणे व पुन्हा तेच मुलांना ऐकवणे. |
| १२ | प्रत्येक वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यास त्या वर्गानुकुल पाठ्य पुस्तकातील कोणतीही किमान पाच वाक्ये श्रुत लेखनाने लिहिता आली. | **उपक्रम १ –** साहेबांचा निरोप लिहून घ्या.<br>**उपक्रम २ –** आदल्या दिवशीचा उतारा दुसऱ्या दिवशी अनुलेखन. कृती : शिक्षकांनी आदल्या दिवशी एखादा उतारा श्रुतलेखनासाठी मुलांना सांगितला असेल तर तोच दुसऱ्या दिवशी अनुलेखानासाठी वापरणे. |

| | | |
|---|---|---|
| | | **उपक्रम ३ –** शब्दमाल गाडी. कृती :शिक्षकांनी एखादा शब्द मुलांना सांगावा, व त्या शब्दाच्या शेवटच्या अक्षरापासून सुरु होणारे शब्द पुढे एकेकाने सांगत जावे. किंवा उदा मर – मारा– मीरा याप्रमाणेपण घेऊ शकतो, वेलांटी चा माल याप्रमाणे मालगाडी बनवणे.तसेच इतर स्वरचिन्हाचा वापर यात करू शकतो.<br>**उपक्रम ४–** बाराखडी व अक्षरे चिन्हांतून शब्द तयार करणे. कृती : खुणेची भाषा वापरून बाराखडी, अक्षरे चिन्हांतून वेगवेगळे शब्द तयार करायला सांगणे. |
| **१३** | वर्गानुकुल आशयाच्या आकलनावर आधारित विचारलेल्या पाच प्रश्नांची उत्तरे वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यास देता आली. | **उपक्रम १ –** उतारा वरून प्रश्न तयार करणे. कृती : एक उतारा लिहून त्यावरील २–३ प्रश्न कसे तयार करायचे हे शिक्षकांनी मुलांना दाखवावे. नंतर गटात मुलांना एक–एक उतारा देऊन प्रश्न तयार करायला सांगावे.<br>**उपक्रम २ –** परिपाठातून बोधकथा व प्रश्नउत्तरे. कृती : परिपाठात बोधकथा होतात, त्या झाल्यावर काही मुलांना प्रश्न तयार करायला सांगावे आणि काहीना त्याची उत्तरे द्यायला सांगावी.<br>**उपक्रम ३ –** प्रश्नमंजुषा. कृती: वर्गात वेगवेगळे विषय देऊन प्रश्नमंजुषा घेऊन प्रश्नउत्तरांचा सराव करून घ्यावा. |
| **१४** | कोणत्याही वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यास एक शब्द दिल्या नंतर त्या शब्दाच्या शेवटच्याअक्षरापासून तयार होत जाणारे आणखी एक एक असे पाठ्य पुस्तका बाहेरील पाच शब्द तयार करता आले. | **उपक्रम १ –** शब्दचक्र, शब्दसाखळी, शब्दभेंड्या. कृती : शिक्षकांनी एक आशय देऊन मुलांना त्यापासून शब्द सांगायला सांगणे. उदा, गुलाब–जाई. किंवा शेवटच्या अक्षरापासून सुरु होणारे शब्द सांगायला सांगावे. |

| | | |
|---|---|---|
| **१५** | कोणत्याही विद्यार्थ्यास पाठ्यपुस्तकातील कोणतीही कविता वैयक्तिकरित्या साभिनय सादर करता आली. बाहेरील पाच शब्द तयार करता आले. | **उपक्रम १ –** शिक्षकांनी पाठ्यपुस्तका व्यतिरिक्त गाणी, कविता हावभाव व कृतीयुक्त मुलांसोबत घ्यावी. |
| **१६** | कोणत्याही वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यास चित्र वाचन करता आले. | **उपक्रम १ –** सत्रानुसार भिंतीवर पाठ्यपुस्तक लावणे.सविस्तर कृती पान क्र.१५ व १६ वर पहा |
| **१७** | कोणत्याही वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यास वर्गानुकुल तीन शब्द देवून त्यापासून किमानपाच वाक्य तयार करता आली. | **उपक्रम १ –** शब्दमनोरा. सविस्तर कृती पान क्र. १७, १८ व १९ वर पहा |
| **१९** | कोणत्याही वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यास वर्गानुकुल तीन सोपे शब्द देवून त्यापासून गोष्ट तयार करता आली. | **उपक्रम १ –** कृती : मुलांना सुरुवातीला त्याच्या भावविश्वातील सोपे तीन शब्द द्यावे त्यावरून त्याला गोष्ट तयार करायला सांगणे. तसेच शब्दमनोरा झाल्यावर त्यावर आधारित गोष्ट तयार करायला सांगावे. |
| **२२** | कोणत्याही वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यास वर्गानुकुल तीन सोपे शब्द देवून त्यापासून किमान चार ओळीची कविता तयार करता आली. (बोनस) | **उपक्रम १ –** कृती : मुलांना प्रथम एक शब्द देऊन त्यावर आधारितयमकाचे सुचतील तेवढे शब्द शोधून लिहायला सांगावे. एकदाका शब्द मिळाले की २–३ ओळींची यमकाचे शब्द घालून कडवी तयार करायला सांगावे. |

## ब. गणित

| ब. गणित | | |
|---|---|---|
| ५ | कोणत्याही वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यास किमान ५ गणिती संख्या अचूक लिहिता व वाचता आली (इ.१ साठी दोन अंकी व पुढे प्रत्येकी एक एक अंक वाढवत जाणे) | **उपक्रम १ –** अंक ठोकळे, कृती: ठोकळ्यावर वेगवेगळ्या संख्या लिहिणे व खेळाद्वारे संख्या वाचण्यास व लिहिण्यास सांगणे. असे विविध अंकठोकळे बनवून त्याने संख्यावाचन,बेरीज,वजाबाकी करता येते.<br>**उपक्रम २ –** टाळी चुटक्यांचा खेळ, कृती :टाळ्या म्हणजे दशक व चुटक्या म्हणजे एकक असे समजावून देवून दोनअंकी पर्यंतच्या संख्यांचे वाचन करून घेता येते. उदा.–३ टाळ्या व ५ चुटक्या म्हणजे३५, अशाप्रकारे वेगवेगळ्या संख्या तयार करून घेणे.<br>**उपक्रम ३ –** चला संख्या बनवूया. कृती : घड्याळातील तास काट्यावर–शतक, मिनिट–काट्यावर दशक आणि सेकंद काट्यावर–एकक लिहावे. व मुलांना इयत्तेप्रमाणे संख्या तयार करायला सांगाव्यात. उपक्रम ४ :संगीतमय खुर्ची,संख्यावाचन/लेखन सविस्तर कृती पान क्र. वर १ व २ पहा. उपक्रम ५ : धूळपाटी. कृती : लहान स्नायूंचा विकास व्हावा तसेच आकार गिरवणे व अंकांच्या सरावासाठी धूळपाटीचा वापर करावा. |

| | | |
|---|---|---|
| ६ | कोणत्याही वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यांस किंवा सर्व विद्यार्थ्यांस शैक्षणिक साहित्याच्या सहाय्याने इयत्तानुरूप किमान एक बेरीज अचूक करता आली) | **उपक्रम १ –** रंगीत खड्यातून बेरीज. कृती:संख्यांच्या स्थानानुसार दगडांना रंग देणे.उदा. एकक–लाल, दशक–निळा, शतक–हिरवा. हे रंग मुलांना सांगणे. २ वेळा खडे टाकून कोणत्या रंगाचे खडे पडले त्यावरून बेरीज करायला सांगणे.<br>**उपक्रम २ –** गणित जाळी, नाणी नोटा, टोपणा तूनबेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार आणि पाढे.<br>**उपक्रम ३ –** विहीर भरा,सविस्तर कृती पान क्र. ३ व ४ वर पहा.<br>**उपक्रम ४ –** चिठ्ठी टाकून शाब्दिक उदाहरण करणे. कृती: प्रत्येक चिठ्ठीमध्ये दोन संख्या व वस्तूचे नाव लिहिणे. अशाच प्रकारे इतर चिठ्ठ्या करणे . चिठ्ठी वाचून मुलांना शाब्दिक गणित तयार करायला सांगणे. उदा. : २, ५ फुले.<br>**उपक्रम ५** – माशांचा गळ कृती:लोहचुंबकच्या सहाय्याने कोणत्याही दोन संख्या मुलांना उचलण्यास सांगणे व त्यांची बेरीज करण्यास सांगणे.<br>**उपक्रम ६ –** तारखेनुसार घरून वस्तू आणणे. कृती: इ. १ ली व २ री च्या विद्यार्थ्यांसाठी गणनपूर्व तयारी व संख्याज्ञान या घटकासाठी रोजच्या तारखेनुसार घरून येताना तेवढ्या वस्तू आणायला सांगणे. उदा.–५ तारीख असेल तर ५ वस्तू आणणे. |

| | | |
|---|---|---|
| ७ | कोणत्याही वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यांस किंवा सर्व विद्यार्थ्यांस किमान इयत्तानुरूप शैक्षणिक साहित्याच्या सहाय्याने किमान एक व जाबाकी अचूक करता आली) | **उपक्रम १ –** रावसाहेबांचा खेळ, दानपेटी,सविस्तर कृती पान क्र.वर पहा.<br>**उपक्रम २ –** गणितीय संख्याचक्रातून वजाबाकी( संख्या चक्रातून गणितीय क्रिया).<br>**उपक्रम ३ –** पदावलीची गोष्ट,सविस्तर कृती पान क्र.११ व १२ वर पहा. |
| ८ | कोणत्याही वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यास किंवा सर्व विद्यार्थ्यास किमान इयत्तानुरूप शैक्षणिक साहित्याच्या सहाय्याने किमान एकगुणाकार अचूक करता आला) | **उपक्रम १ –** वस्तूंची मांडणी करून सोप्या रीतीने पाढा तयार करणे |
| ९ | कोणत्याही वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यास किंवा सर्व विद्यार्थ्यास किमान इयत्तानुरूप शैक्षणिक साहित्याच्या सहाय्याने किमान एक भागाकार अचूक करता आला) | **उपक्रम १ –** भागाकारचा छोटा भीम खेळ आणि गोष्ट सांगणे.सविस्तर कृती पान क्र. २० व २१ वर पहा.<br>**उपक्रम २ –** वस्तूतून, नाणी नोटातून भागाकार, गोष्ट सांगणे |
| १0 | वजन/ मापे/आकारमान/ लांबी/वेळ सांगता आली आणि त्यावर आधारित गणिताची शाब्दिक उदाहरणे सोडवता आली. | **उपक्रम १ –** बाटली च्या माध्यमातून लिटर. कृती : प्लास्टिकच्या बाटलीवर वेगवेगळ्या अंतरावर खुणा करून प्रमाणे लिहावी व मुलांना प्रत्यक्ष पाणी भरून किंवा काही वस्तू भरून मापन करावयास सांगणे.<br>**उपक्रम २ –** संख्या घड्याळ.कृती : पुठ्याच घड्याळ बनवून त्याला आईस्क्रीमच्या |

| | | |
|---|---|---|
| | | काड्यांचे ६–७ काटे बनवावे एका काट्यावर एकक व दुसऱ्या काट्यावर दशक याप्रमाणे कोटीपर्यत स्थानांची नावे लिहावी. यातून संख्याज्ञान या घटकाचा संबोध स्पष्ट करता येतो.<br>**उपक्रम ३ –** प्रत्यक्ष अनुभव देऊन (क्षेत्रभेट) मीटर, सेमी मोजून आणणे.कृती: पाण्याच्या बाटलीवर ठराविक अंतरावर २५० मिली ,५०० मिली, ७५० मिली, १०००मिली असे माप लिहून मुलांना प्रत्यक्षात मोजायला लावावे.<br>**उपक्रम ४ –** शालेय पोषण आहारामार्फत मोजणी. कृती : वर्गातील मुलांची उपस्थिती आणि उपस्थितीला अनुसरून लागणारे साहित्याचे प्रमाण हे लक्षात घेऊन मुलांना हिशेब करण्यास सांगणे.<br>**उपक्रम ५ –** मुलांच्या भावविश्वातील दिनदर्शिका – कालमापन. सविस्तर कृती पान क्र.१३ व १४ वर पहा. |
| **२१** | प्रत्येक वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यास घड्याळातील काटे फिरवून अचूक वेळ सांगता आली. (बोनस) | **उपक्रम १ –** घड्याळबाबा ची गोष्ट सविस्तर कृती पान क्र. २७ व २८ वर पहा. |

## क. अभिव्यक्ती

| क. अभिव्यक्ती | | |
|---|---|---|
| १६ | कोणत्याही वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यास चित्र वाचन करता आले. | **उपक्रम१ –** पाठ्यपुस्तकाबाहेरील चित्रे पुठ्यावर चिटकवून वाक्य करणे व मुलांना वाचायला सांगणे. |
| १८ | मुलाच्या चेहऱ्यावर, बोलण्यात उत्तरे देण्यात, प्रतिसादात आणि वर्तनात कमालीचा आत्मविश्वास दिसून येतो. | **उपक्रम १ –** मुलांत आत्मविश्वास येण्यास बालसभा, परिपाठ, वक्तृत्वस्पर्धा, जादुई पेटी तून शब्द काढून वाचणे, यातून मुलांना प्रोत्साहन द्यावे.<br>**उपक्रम २ –** हुशार बाबा आलारे.... सविस्तर कृती पान क्र.२४, २५ व २६ वर पहा. |
| २० | प्रत्येक वर्गातील मुलांना किंवा सर्व वर्गास एखादी तीन ते पाच मिनिटाची नाटिका सादर करता आली. | **उपक्रम १ –** नाटिका सादरीकरण कृती : मुलांना पाठ्यपुस्तकातील मनोरंजक पाठ देऊन मुलांना गटागटाने त्यावर स्वतःलाच गोष्टीच्या माध्यमातून सगळ्यांसमोर नाटक सादर करायला सांगणे. |
| २४ | कोणत्याही वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यास वर्गानुकुल एका वस्तूचे चित्र रेखाटता आले. (बोनस) | **उपक्रम १ –** चित्रकलेच्या माध्यमातून मुलांना त्यांच्या आवडीचे चित्र नंतर कल्पना करून चित्र काढणे यासाठी वेगवेगळे विषय देऊ शकतो. |
| २५ | कोणत्याही वर्गातील कोणत्याही विद्यार्थ्यास उभे राहून वर्गानुकुल दिलेल्या विषयावर चार ते पाच वाक्यात आपले विचार मांडता आले. (बोनस) | **उपक्रम १ –** मुलांना परिपाठ, बालसभा, शाळेत होणारे कार्यक्रम यात बोलण्याची संधी द्यायला हवी. मुलांचे म्हणणे एकून घ्यायला हवे. यामुळे पुढे जाऊन मुले एखाद्या विषयावर आपले मत मांडू शकतात. |